गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १५६ वा ● बुधवार २५ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 156 | Date : 25/10/2023 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

## लक्षावधी अनुयायांच्या साक्षीने दीक्षाभूमीवर २०० कोटींच्या ई-भूमिपूजनाचा कार्यक्रम संपन्न



नागपूर : नागपूरच्या दीक्षाभूमीवर ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी जमलेल्या अलोट जनसागराच्या साक्षीने राज्य शासनाने २०० कोटी रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ केला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑनलाईन संदेश देऊन तर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून या शुभ कार्याची आज मुहूर्तमेढ रोवली.

नागपूर येथे ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पर्वावर ही घोषणा करण्यात आली. यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला अधिकृत एजन्सी म्हणून मान्यता देण्यात आली आहे. दीक्षाभूमीच्या २२.८० एकर परिसराचा विकास जागतिक दर्जाचा करण्यात येणार आहे. आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत इलेक्ट्रॉनिक्स कळ दाबत या विकास कार्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी राज्य शासनातर्फे ७० कोटी रुपयांच्या धनदेशाचे वितरणही करण्यात आले.यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई, प्रमुख पाहुणे डॉ.आफिनिता चाई चाना, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खा. कृपाल तुमाने, पोलीस आयुक्त अमीतेश कुमार, नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर,महानगरपालिका आयुक्त डॉ.अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती मनोजकुमार सूर्यवंशी, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीचे सदस्य डॉ.कमलाताई रा.गवई, ॲड. मा.मा. येवले, डॉ. सुधीर फुलझेले, ॲड आनंद फुलझेले, एन.आर. सुटे, डॉ.राजेंद्र गवई, डी.जी.दाभाडे,। पान २ वर

## नेहरू युवा केंद्राचे कार्यालयामध्ये दारूच्या बॉटल सापडल्या एमटीएस सुभाष चव्हाण निलंबीत

सोलापूर/प्रतिनिधी : स्थानिक प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधी दिनांक १९ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजता नेहरू युवक केंद्र कार्यालयात आले असताना कार्यालयामध्ये दारूच्या बॉटल सापडल्या याबाबत दैनिक यश सिध्दी न्युज मध्ये वृत्त प्रसिद्ध झाले होते. प्रसिद्ध झालेल्या त्या वृत्ता बाबत नेहरू युवा केंद्राचे एमटीएस सुभाष चव्हाण हे दोषी आढळले आहेत. नेहरू युवा केंद्रात दारूच्या बॉटल सापडणे व अन्य काही आरोप सुभाष चव्हाण यांच्यावर लावण्यात आले आहेत. प्रसारित झालेल्या वृत्तानुसार सुभाष चव्हाण हे प्राथमिक स्तरावर दोषी आढळले आहेत. चव्हाण यांच्या अशा वर्तुणुकीमुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नेहरू युवा केंद्र संघटनाची प्रतिमा मलीन झालेली आहे.उपरोक्त संपूर्ण स्थिती लक्षात घेता सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार नेहरू युवा केंद्र सोलापूरचे एमटीएस सुभाष चव्हाण यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे




आदेश देण्यात आलेले आहेत. चव्हाण यांचे निलंबन कालावधीत नेहरू युवा केंद्र सोलापूर हेच मुख्यालय राहणार असल्याचेही त्यात नमूद केलेले आहे, अशी माहिती सोलापूर नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

नेहरू युवा केंद्रात उपरोक्त घटना घडल्यानंतर जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घटनेची गंभीर दखल घेऊन जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार यांना तात्काळ संबंधित कर्मचारी याचा रिपोर्ट करण्यास कळवले. त्यानुसार अजित कुमार यांनी संबंधित कर्मचारी व घटनेविषयी सविस्तर अहवाल त्यांच्या वरिष्ठ कार्यालय व जिल्हा प्रशासनास केला. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या घटनेची घेतलेली गांभीर्यपूर्वक दखल व केलेला पाठपुरावा यामुळे नेहरू युवा केंद्राचे एमटीएस चव्हाण यांना त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाने निलंबित केलेले आहे. जिल्हा प्रशासनात अशा प्रकारची कोणतीही अनुचित घटना खपवून घेतली जाणार नाही असा संदेश या कारवाईतून देण्यात आलेला आहे.

चव्हाण यांच्या कार्य काळात झालेल्या अनेक वेग वेगळे भाजगड्या आहेत त्यात विविध कार्यक्रम बोगस दाखवून बिले उचले आहेत, अनेक संस्थांना आर्थिक मदत मिळवून देतो म्हणून रक्कमा घेतले आहे बोगस पावत्या जोडून बिले काढण्यात आले आहे त्याचीही उच्चस्तरीय चौकशी करण्याचे मागणी युवा मंडळातून होत आहे



## सोलापूर लोकसभेची जागा प्रणिती शिंदेच लढविणार

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदारसंघातून आमदार प्रणिती शिंदे याच निवडणूक लढवतील, असे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी सांगितले. मंगळवारी, धम्मचक्र प्रवर्तनदिनाच्या निमित्ताने शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पत्रकारांनी सोलापूर लोकसभा मातदारसंघातून कोण निवडणूक लढविणार असा प्रश्न उपस्थित केल्यानंतर शिंदे यांनी किती वेळा सांगू असा उलटप्रश्न करीत प्रणिती याच या मतदारसंघातून निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले. आता मी राजकारणातून निवृत्त झालोय, प्रणिती शिंदे याच उमेदवार राहतील त्यासाठी माझ्याकडून जितका प्रयत्न होईल तितका मी फिरतोय असे यावेळी शिंदे यांनी सांगितले. यावेळी शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर सुशीला आबुटे, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड. गौरव खरात, मागासवर्गीय सेलचे शहराध्यक्ष उमेश सुरते, बाबा मिस्त्री, विनोद भोसले, प्रवीण निकाळजे, गणेश डोंगरे, प्रमिला तूपलवंडे, बाबा करगुळे, वैष्णवी करगुळे, मधुकर आठवले आदी उपस्थित होते.

## आमचं सरकार आलं तर तुम्हालाही उलट टांगू; उद्धव ठाकरे यांचा हल्लाबोल




मुंबई : शिवसेना ठाकरे गटाच्या दसरा मेळाव्यात आज पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठा आरक्षणापासून ते राज्य आणि केंद्र सरकारच्या कारभारावर स्पष्ट भाष्य केले. एक लवाद जर सुप्रीम कोर्टाचे ऐकत नसेल तर देशात लोकशाही राहणार आहे की नाही असा खडा सवालही त्यांनी यावेळी केला. ज्यांनी पाशवी बहुमत मिळते अशी लोक देशासाठी घातक असतात. हिटलर हे त्याचे उदाहरण असल्याचे सांगत ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींवर बोचरी टीका केली.

शिवाजी पार्क येथील दसरा मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांचे अभिनंदन केले. जरांगे यांनी धनगरांच्या आरक्षणाच्या मुद्याला पाठिंबा दिला. जातीमध्ये फूट पाडण्याचा भाजपचा डाव उधळून लावण्याचा प्रयत्न केल्याबद्दल जरांगे यांचे अभिनंदन करत असल्याचे ठाकरे यांनी म्हटले. मराठा आरक्षणाची मागणी मान्य करण्यासाठी संसदेच्या अधिवेशनात । पान २ वर

## कावळ्याच्या शापाने गाय मरत नसते, आमच्याकडे २१० आमदार : एकनाथ शिंदे




मुंबई : जसे मोगलांच्या काळामध्ये त्यांच्या घोड्यांना पाणी पिताना संताजी-धनाजी दिसायचे तसे तुम्हाला मी दिसतोय का? असा सवाल करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर जोरदार टीका केली. गहान टाकलेली शिवसेने सोडवण्याचे काम मी केले. मी गुन्हा केलाय का? असे शिंदे म्हणाले. मी मुख्यमंत्री झाल्यापासून सरकार पडणार पडणार म्हणत होते. मात्र, आमचे सरकार मजबूत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. कावळ्याच्या शापाने गाय मरत नसते, आमच्याकडे २१० आमदार आहेत. जोपर्यंत जनता माझ्यासोबत आहे, तोपर्यंत मला पदाची अपेक्षा नाही असे एकनाथ शिंदे म्हणाले.

कोरोनाच्या काळात तुम्ही घरे पैसे मोजत होता. खिचडीमध्ये पैसे खाल्ले, ऑक्सीजनमध्ये पैसे खाल्ले, कुठे फेडाले हे पाप. तुम्हाला जनता माफ करणार नाही. मुंबई पालिकेच्या कामात तुम्ही काळ्याचं पांढर करत होतात. चंद्र सूर्य आहे तोपर्यंत मुंबईला कोणाचा बाप तोडू शकत नाही । पान २ वर

## धम्मचक्र प्रवर्तनदिनिमित्त शहरातील विविध मंडळांकडून उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणुका

सोलापूर/प्रतिनिधीः पारंपरिक वाद्यावर गणवेशधारी कार्यकर्त्यांचा बहारदार लेझीम खेळ, भगवान गौतम बुध्दांच्या जीवनावर आधारित देखावे सादर करीत शहरातील विविध संस्था आणि मंडळांकडून मोठ्या जल्लोषपूर्ण वातावरणात गौतम बुध्दांच्या मूर्तीची मिरवणूक काढून शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले. ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मंगळवारी सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात हजारो अनुयायींनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. दरम्यान, शहरातील विविध मंडळाच्यावतीने मिरवणुका काढून व देखाव्याच्या माध्यमातून बुध्द विचारांचा जागर केला. तसेच पारंपरिक वाद्यावर विविध मंडळांच्या कार्यकर्त्यांनी बहारदार लेझीम खेळ सादर करून शहरवासियांची मने जिंकली. प्रबुध्द भारत तरुण मंडळाच्या भव्य मिरवणुकीस पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने व महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते तथागत गौतम बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रारंभ करण्यात आला. मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या मिरवणुकीत शेकडो कार्यकर्त्यांनी बहारदार लेझीम खेळ सादर केला. आर्टिफिशियल फुलांचा देखावाही सादर करण्यात आला. याशिवाय मातोश्री रमाबाई आंबेडकर तरुण मंडळ, आर. जी. कंपनी, सिध्दार्थ तालीम संघ, भीमसृष्टी प्रतिष्ठान, प्रशिक सामाजिक संस्था, आनंद बौध्द। पान २ वर




## मराठा आरक्षणासाठी सरकारला दिलेला अल्टिमेटम संपला, मनोज जरांगे आजपासून आमरण उपोषणाला बसणार

मुंबईः मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा दुसरा पार्ट आजपासून सुरू होणार आहे. मराठा समाजाला ओबीसी तून आरक्षण द्या, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. दरम्यान, राज्य सरकारला दिलेलं ४० दिवसांचं अल्टिमेटम आज संपला आहे. त्यामुळे मनोज जरांगे यांनी जाहीर केल्याप्रमाणे ते आजपासून आमरण उपोषणाला बसणार आहेत. तसेच, प्रत्येक जिल्हा पातळीवर साखळी उपोषण करण्यात येणार आहे. तसेच पुढाऱ्यांनांही गावबंदी करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज सकाळी ११ वाजता मनोज जरांगे पाटील यांची पत्रकार परिषद घेणार आहेत. या पत्रकार परिषदेत मनोज जरांगे काय बोलणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी मनोज जरांगे यांना सरकारला थोडा वेळ देण्याची विनंती केली आहे. मात्र, यावर मनोज जरांगे यांनी आता



कोणालाही वेळ दिला जाणार नाही, त्यांनीच वेळ घेतलेला आहे. चाळीस दिवसाचा आणि समाजाने मुख्यमंत्र्यांच्या सन्मान ठेवला आहे एक महिन्यापेक्षा अधिक दिवस सरकारला दिले होते, वेळ त्यांनी स्वतः घेतलेला आहे, त्यामुळे आता वेळ मिळू शकत नाही, अशी स्पष्ट भूमिका जरांगे यांनी घेतली आहे.

जरांगे यांनी पुढे म्हटलं, गिरीश महाजन साहेबांनी सांगितले की, उपोषणाला बसू नका शरीराला ताण होईल तर मग आरक्षण द्या, मी उपोषणाला बसत नाही, असंही त्यांनी यावेळी सांगितले शब्द त्यांनी दिला. चार दिवसात कायदा पारित होत नाही म्हणून वेळ द्या. असं गिरीश महाजन यांनी सांगितलं होतं कायद्याचा आधार घेऊन कायदा पारित करावा लागेल त्यासाठी एक महिन्याचा वेळ मागितला होता आम्ही चाळीस दिवस दिले मग आता वेळ कशासाठी पाहिजे समाज म्हणून आम्ही त्यांना एक घंटाही वेळ देऊ शकत नाही तुम्ही आज रात्रीच आरक्षण जाहीर करा असेही त्यांनी सुनावलं आहे.

जरांगे यांनी मराठा समाजाला आत्महत्या । पान २ वर



## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेत गरबा, दांडिया व भोंडला कार्यक्रम उत्साहात साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित, अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे नवरात्र महोत्सवानिमित्त घटस्थापनेच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू असलेल्या विविध उपक्रमाचा सांगता समारंभ नवरात्रीत देशभरात आणि विशेषतः गुजरात व पश्चिम महाराष्ट्रात खेळला जाणारा, देवी दुर्गा व राक्षस महिषासुर यांच्यात झालेल्या युद्धातील देवी दुर्गामातेच्या विजयोत्सवाचे प्रतीक असलेल्या गरबा, रास दांडिया व भोंडला कार्यक्रमाने पार पडला. सर्वप्रथम संस्थेच्या जेष्ठ मार्गदर्शिका सौ. स्वरुपा सिद्धप्पा कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या , नृत्यकलेची अधिष्ठात्री देवता नटराज च्या व हस्त नक्षत्रात येणारा नवरात्रोत्सव माँ दुर्गाच्या वेगवेगळ्या वाहनापैकी एक असलेल्या हत्तीच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ. शांभवी कल्याणशेट्टी, सी. ई.ओ.सौ.रुपाली शहा, सौ. पुनम कोकळगी व गावातील आजी- माजी महिला सरपंच, ग्रामपंचायतीच्या महिला सदस्यां, महिला पालकवर्ग,प्रशालेच्या पाचवी ते बारावी पर्यंतच्या मुली बहुसंख्येने उपस्थित होत्या. यानंतर गरबा, दांडिया व भोंडला कार्यक्रमास सुरुवात झाली.प्रशालेच्या मुलींनी सदर कार्यक्रमास उस्फूर्त प्रतिसाद देत अतिशय सुंदर नृत्य सादर केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेच्या सांस्कृतिक विभाग सहाय्यिका मल्लम्मा चप्पळगाव, सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा कुपवाडा येथे उभारण्यासाठी राजधानीतून रवाना

## निवासी आयुक्त रूपिंदर सिंग यांच्या कडून पुतळ्याची पूजा करून कुपवाडासाठी रवाना

नवी दिल्ली : जम्मू आणि काश्मीर सीमेवर कुपवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार असून हा पुतळा राजधानी स्थित महाराष्ट्र सदनातून निवासी आयुक्त तथा प्रधान सचिव रुपिंदर सिंग यांच्या हस्ते कुपवाडा कडे आज सकाळी रवाना करण्यात आला.राज्याचे राज्यपाल रमेश बैस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा समारंभपूर्वक कुपवाडा येथे २० ऑक्टोंबर २०२३ रोजी मुंबई येथून रवाना करण्यात आला होता. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, संस्थेचे विश्वस्त अभयसिंह शिरोळे, अध्यक्ष हेमंत जाधव उपस्थित होते.हा पुतळा महाराष्ट्रातून निघून काश्मीरकडे मार्गस्थ होणार. दिल्लीहून रवाना होण्यापूर्वी यानिमित्ताने दिल्ली मराठी प्रतिष्ठान तर्फे



येथील महाराष्ट्र सदनात काल उशीरा रात्री एक लहान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रतिष्ठान तर्फे निवासी आयुक्त तथा प्रधान सचिव श्री रूपिंदर सिंग, सहाय्यक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावर, मेजर जनरल सुजित पाटील, ' आम्ही पुणेकर' संस्थेचे विश्वस्त अभयसिंह शिरोळे, अध्यक्ष हेमंत जाधव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या सोहळ्यास दिल्लीतील मराठी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबईतील राजभवनातून रवाना होणारा छत्रपतींचा हा पुतळा बडोदा, दिल्लीमार्गे रस्त्याने प्रवास करून साधारण दहा ते बारा दिवसात कुपवाडा येथे पोहोचेल.

'आम्ही पुणेकर' या संस्थेच्या वतीने जम्मू काश्मीर मधील कुपवाडा येथे भारत पाक सीमेवर मराठ्यांच्या पराक्रमाची माहिती देण्यासाठी छत्रपती शिवरायांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे. 'आम्ही पुणेकर फाउंडेशन' व 'छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती यांच्या पुढाकाराने तयार करण्यात आलेला हा पुतळा कुपवाडा येथील मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंटला स्थापनेसाठी देण्यात येणार आहे. भारतीय सैन्याच्या छावणीत उभारण्यात येणारा हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा साडे दहा फुट उंचीचा असून जमिनीपासून जवळपास तितक्याच उंचीच्या आणि ७ ु ३ या आकाराच्या चौथऱ्यावर उभारण्यात येणार आहे. कुपवाडा येथील भारतीय सैन्याच्या छावणीत या पुतळ्याच्या स्थानाचे भूमीपूजन भारतीय सेनेच्या राष्ट्रीय रायफल्स च्या ४१ व्या बटालीयनचे (मराठा लाईट इन्फ्रंटरी) कमांडिंग ऑफीसर कर्नल नवलगट्टी आणि छत्रपती शिवाजी स्मारक समितीचे अध्यक्ष अभयराज शिरोळे यांच्या हस्ते दि. २० मार्च २०२३ रोजी झाले. नवीन तंत्रज्ञानाने बनविलेला छत्रपतींचा हा पुतळा जम्मू काश्मीर मधील प्रतिकूल हवामानात दिर्घकाळ तग धरेल असा बनवला गेला आहे. 'आम्ही पुणेकर' या संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव यांनी माहिती देताना सांगितले की परिस्थिती अनुकूल असल्यास संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ७ नोव्हेंबर रोजी पुतळ्याचे अनावरण करण्यात येईल.

## टाकळीवाडी येथे झोपलेल्या हिंदूला खडबडून जागे करण्याची धमक दुर्गा दौडीत दिसून आली

टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे सकाळी६.३०वाजलेपासून दुर्गामाता दौड अनेक मार्गाने गल्लीबोळातून निघाली,पृथ्वीतलावर जेव्हा जेव्हा संकट आले तेव्हा तेव्हा दुर्गामाता अनेक रुप धारण केले तसेच शिवरायांच्या अपार पराक्रमाची गाथा, झोपलेल्या हिंदूंना खडबडून जागे करण्यासाठी आज दुर्गामाता दौडीत दिसून आले,शिवरायासारखं रत्न या भारतभुमीत लाभणं व महाराष्ट्रात जन्माला येणं हे ज्वलंत इतिहास व आईभवानी मातेचा आशिर्वाद,तसेच हिंदू धर्माचे रक्षण करणे गरजेचे आहे.इतिहासातील शिवराय अजून जिवंत आहे हे आजच्या तरुण-बाल पिडीच्या नसानसांत आपल्याला पोहोचवण्यासाठी व एक शिवजी महाराज इतके करू शकतात तर प्रत्येकात शिवराय जन्माला आले तर काय होईल,हे आजच्या गर्जनेतून टाकळीवाडी तील तरुणांच्या जोशात दिसून आले आहे.चोख नियोजन निशांत गोरे,निवास एक्संबे,निलेश



वनकोरे,भरत सलगरे,दिपक बदामे,कृष्णात कोळी(माणगांवे)सुधीर गोरे, व अनेक लहानमोठे तरूण-तरूणी व ग्रामस्थ या दुर्गामाता दौडीत सहभागी होते.

## कालिका देवस्थान येथे दसरा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील आराध्य दैवत विश्वब्राह्मण कालिका देवस्थान येथे दसरा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम संपन्न झाला. गेल्या पाच दशकापासून अक्कलकोट बायपास रस्त्यावरील विश्व ब्राह्मण कालिका देवस्थान येथे घटस्थापने पासून दुर्गाष्टमी पर्यंत दसरा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विश्वकर्मा पांचाळ समाजाच्या वतीने पारायण कुंकुमार्चन कुमारी का पुजा भोंडला दांडिया डान्स आधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

यावेळी शेकडो महिला कार्यक्रमात सहभागी झाले होते. सदरील आठ दिवस चाललेल्या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वंदना पोतदार अमृता पोतदार शरयू पोतदार अंकिता पोतदार करुणा पोतदार रोहिणी पोतदार साधना पोतदार चंद्रकला पोतदार अश्विनी वेदपाठक सुरेखा माशाळे वर्षा म्हेत्रे महादेवी बिराजदार राजश्री कांबळे नम्रता पोतदार राणी पोतदार गीता निंबाळकर सविता पत्की आदींनी परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा

मुंबई : धम्मचक्र प्रवर्तन दिनामुळे कोट्यवधींच्या जीवनात सन्मानाची पहाट झाली. हा दिवस सामाजिक क्रांतीचा अमृत क्षण ठरला आहे, अशा भावना व्यक्त करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धम्म चक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

महामानवाचा पदस्पर्श झालेल्या दीक्षाभूमीचा कायापालट करणार असल्याची ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी संदेशात दिली आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी म्हटले आहे की, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीक्षाभूमीवर सामाजिक क्रांतीचा पाया रचला. आधुनिक भारत या पायावर उभा आहे. त्यांची शिकवण जगाला सुद्धा मार्गदर्शक आहे. डॉ बाबासाहेबांनी दीक्षाभूमीवर हजारो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. आज हे स्थान जगासाठी ऊर्जा स्थान ठरले आहे. इथे लाखो नागरिक, अनुयायी भेट असतात. म्हणून या पवित्र स्थळाचा कायापालट करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दीक्षाभूमी विकासाच्या सुमारे २०० कोटींचा विकास आराखड्याला मान्यता दिल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले आहे.

## पंढरपुरात डॉ.प्रशांत निकम यांच्या टयुलिप सुपर स्पेशलिस्ट हॉस्पिटलचा मातोश्री पुष्पलता निकम यांच्या हस्ते लोकार्पण

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहरातील ड्रॉ प्रशांत निकम यांच्या नव्यानेच बांधलेल्या ट्यूलिप सुपर स्पेशालिस्ट पेशालिस्ट हॉस्पिटलच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा ड्रॉ प्रशांत निकम यांच्या मातोश्री मातोश्री पुष्प लता निकम यांच्या शुभहस्ते शुभ असते संपन्न संपन्न झाला

या कार्यक्रमास शिक्षक आमदार शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत सर विठ्ठलाचे चेअरमन अभिजीत पाटील अभिजीत डॉ निकम यांच्या मातोश्री पुष्पलता निकम राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष जिल्हाध्यक्ष गणेश पाटील पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष दिलीप चव्हाण दिलीप पंढरपूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष नागेश भोसले रोहन परिचारक यशवंतराव चव्हाण नागरी पतसंस्थेचे संचालक रणजीत पाटील वसंतराव काळे सहकारी साखर कारखाने संचालक दिनकर कदम अण्णा शिंदे महाराजांच्या प्रसिद्ध भारूडकार चंदाताई तिवाडी तसेच पंढरपुरातील नामांकित डॉक्टर मंडळी सामाजिक




कार्यकर्ते क्रीडा व राजकीय क्षेत्रातील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते पंढरपूर मध्ये आत्ता भव्य मोठी अद्यावत व आधुनिक आधुनिक अशी सर्व सोयीने युक्त हॉस्पिटलची सुसज्ज सुसज्ज देखणी भव्य इमारत उभारले असून हॉस्पिटलमध्ये अनुभवी कर्मचारी स्टाफ व ज्यादा भरती करण्यात आली आहे

## अन्नदान सेवा हे महान कार्य असून परिसरातील स्वच्छतामुळे मन प्रसन्न : मुख्याधिकारी विद्या पाटील

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या

नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अन्नदान सेवा हे महान कार्य असून परिसरातील स्वच्छतामुळे मन प्रसन्न होत असल्याचे मनोगत बार्शी तालुक्यातील वैराग नगर पंचायतीचे मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी व्यक्त केल्या.त्या श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी नितीन शिंदे,संजय गोंडाळ, निखिल पाटील व मंडळाचे पुरोहित संजय कुलकर्णी, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, बाळासाहेब पोळ, दत्ता माने,



बाळासाहेब घाटगे, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## सर्वसामान्यांच्या जीवनात परिवर्तन आणणारा दसरा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नागरिकांना शुभेच्छा

मुंबई : राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यात चांगले परिवर्तन आणणारा हा विजयादशमीचा पवित्र सण असून यानिमित्त या निमित्तानं आपण आनंद आणि स्नेहाचं सोनं लुटूया, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागरिकांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.राज्य शासनाने विविध क्षेत्रात राज्याला देशात आघाडीवर नेणं हेच ध्येय ठेवलं असून आपण आता पुढं निघालो आहोत. राज्याचा सर्वांगीण विकास हा आमचा ध्यास आहे. या सणाकडून प्रेरणा घेऊन आपण महाराष्ट्राला बलशाली करुयात असेही मुख्यमंत्री म्हणतात. 'नऊ दिवस देवी मातेची पूजा केल्यानंतर आता विजयादशमी आली आहे. दसऱ्याच्या दिवशी आपण धन, ज्ञान आणि भक्तीची पूजा करतो. सोने म्हणजेच आपट्याची पाने, पाटी-पुस्तकं अर्थात सरस्वती देवीची आणि शस्त्रास्त्रांचं पूजन करण्यात येते.'दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा' असं आपण म्हणतो, कारण खरोखरच हा चैतन्यदायी सण आपल्या सर्वांच्या आयुष्यात आनंद घेऊन येतो. आपल्या संस्कृतीत विजयादशमीला खूप महत्त्व आहे, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतात की, दुष्ट प्रवृत्तीवर मिळविलेल्या विजयाचं प्रतीक म्हणजे विजयादशमी आहे. वाईट गोष्टींना दूर करून पुढं जाण्याचा हा क्षण आहे. अज्ञानावर ज्ञानानं, शत्रूवर पराक्रमानं, वैऱ्यावर प्रेमानं विजय मिळवायचा असा हा दिवस आहे.साडेतीन मुहुर्तातील एक मुहुर्त म्हणून दसऱ्याच्या मुहुर्तावर आपण नव्या योजनांचा, चांगल्या गोष्टींचा प्रारंभ करुया, असेही मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

## कोळेकरवाडीच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही : आ.कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधी : कोळेकरवाडी नेहमीच भारतीय जनता पक्षाच्या पाठिशी कायम उभी राहिली आहे. या वाडीच्या विकासासाठी आपण कटीबद्द आहोत असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

ते कोळेकरवाडी नं.१ येथील प्लॉट नं.४४ येथे जय हनुमान गणेश व नवरात्र उत्सव तरुण मंडळाच्यावतीने आयोजित नवरात्र महापूजाप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी यांचा सत्कार सोहळ्याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी बोलत होते.

पुढे बोलताना आमदार कल्याणशेट्टी, कोळेकरवाडीने ज्याप्रमाणे साथ दिली आहे. त्याप्रमाणे भविष्यातही कायम राहो. वाडीच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. ग्रामस्थांच्या प्रत्येक प्रश्नांची सोडवणूक



करण्याकरिता कटीबद्द असल्याचे आमदार कल्याणशेट्टी म्हणाले.

याप्रसंगी भाजपा तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, बाळासाहेब भोसले, संजय भोसले, माजी सरपंच अबुबकर शेख, इरफान शेख, रवि राठोड, माजी पं.स.सदस्य राजकुमार बंदीछोडे, माजी उपसरपंच लक्ष्मण डांगे, कृषी सेवा केंद्राचे तुकाराम मोरे, शंकरराव साबळे, महादेव निकम, भगवानराव खरात, अंबादास डांगे, उत्तम घावटे, अंबादास शहापूरे, श्रीमंत पालकर, सुरज खरात, साहेबराव खरात, बिरदेव कोळेकर, गोविंद क्षिरसागर, बाळासाहेब खरात, गणेश नरवडे, अण्णा बंडगर, जयवंत कोळेकर, राजकुमार कृष्णात खरात, मधुकर क्षिरसागर, चिदानंद निकम, सुनिल शिंदे, राठोड काळेगाव, दत्ता शहापुरे यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थत बहुसंख्येने उपस्थित होते.यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार देखील संपन्न झाला.

# बसवेश्वर मार्केट यार्ड अक्कलकोट येथे दसऱ्याच्या मुहूर्तावर सौदा चालू

अक्कलकोट/सोहेल फरास : दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर अक्कलकोट येथील बसवेश्वर मार्केट यार्ड येथे सौदा काढण्यात आले. यावेळी बसवेश्वर मार्केट यार्ड कमिटीचे अध्यक्ष बसवराज घिवारे उपाध्यक्ष संतोष भंडारे सचिव मुसा बागवान व तसेच व्यापारी स्वामीनाथ हिपरगी ,स्वामीनाथ नागोरे, विजयकुमार कापसे, महादेव डोंगरे,मदर बागवान,पिंटू कोळी, गुरुशांत कुंभार व सर्व व्यापारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सौदा काढण्यात आले. यंदाचा रब्बी पीक हा पावसाअभावी सर्व वाया गेल्यामुळे बसवेश्वर मार्केट यार्ड येथे आवक कमी असल्यामुळे भाव वाढले आहेत.मूग,हरभरा, सोयाबीन,तूर,ज्वारी,बाजरी, मका, जोड,गहू,धने इत्यादीचे सौदे करण्यात आले. सौद्यामध्ये निघालेले भाव पुढील प्रमाणे मूग ८४०० ते १०००० हरबरा ५१०० ते ६००० सोयाबीन ४५०० ते ४७०१ तुर १२००० ज्वारी ४८०० ते ५१५१ बाजरी २८०० ते ३००१ मक्का २५०१ जोड ३२०१ते ३६०० गहू ३६००ते ३८०० धणे ६१०० अशाप्रकारे सौदा सोडण्यात आले





धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रशिक सामाजिक बहुउद्देशिय संस्था च्या वतीने भव्य लेझीम ताफा चे उदघाटन करताना आर पी आय महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित भीमसैनिक

# श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या ६२ व्या गळीत हंगामाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुभारंभ

## ऊसतोड कामगारांच्या मागण्यांवर मार्ग काढण्यास राज्य शासन सकारात्मक : अजित पवार

पुणे : ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. ऊसतोड कामगारांच्या मागण्यांबाबत त्यांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन राज्य शासनाच्यावतीने सकारात्मक पद्धतीने मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

सोमेश्वर येथे श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या ६२ व्या गळीत हंगाम शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार दत्तात्रय भरणे, संजय जगताप, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, संचालक संभाजी होळकर, दत्तात्रय येळे, श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष ड. पुरुषोत्तम जगताप, उपाध्यक्ष प्रणिता खोमणे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, राज्याचा यंदाचा ऊस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची वाटचाल योग्य दिशेने सुरु आहे. २०२२-२३ या गाळप हंगामाकरीता राज्यात सर्वाधिक असा प्रती मे. टन ३ हजार ३५० रुपये इतका ऊसदर जाहीर केला आहे. आगामी काळातही




आपल्या कार्यक्षेत्रातील ऊसउत्पादकशेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी संचालक मंडळांने प्रयत्न करावेत. यंदाचे पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी असल्यामुळे उसाच्या क्षेत्रात व साखर उत्पादनात होणारी घट याचाही विचार करावा.

साखर कारखान्याने प्रदूषणविषयक नियमांचे पालन करावे

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने लेखापरीक्षण केल्यानंतर पर्यावरणबाबत निष्काळजी केल्याबद्दल राज्यातील ४५ साखर कारखाने बंद करण्याबाबत केंद्रीय पर्यावरण विभागाने कळविले आहे. याचा विचार करता संचालक मंडळाने बदलत्या काळानुसार नवनवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात. साखर उद्योगाबाबत कारखान्यांचे संचालक मंडळ, अधिकारी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी अभ्यास करावा. पाण्याचे काटकसरीने नियोजन करावे

कालवा सल्लागार समितीच्या माध्यमातून पुणे, सातारा, सोलापूर व अहमदनगर या जिल्ह्याला पाणी देण्याचा सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे. जनाई सिरसाई उपसा सिंचन योजनेसाठी अत्याधुनिक पंप व त्याअनुषंगिक बाबी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. मल:निस्सारण प्रक्रिया प्रकल्पाचे पाणी शेतीसाठी वापरण्याबाबत विचार करण्यात येत आहे. कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यावर नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत काम सुरु आहे. मुळशी धरणातील पाणी वीजनिर्मिती ऐवजी जिल्ह्यातील हवेली पुरंदर, इंदापूर, दौंड, बारामती तालुक्यातील भागाला मिळण्याची मागणी करण्यात येत आहे. यावर्षीचे पावसाने ओढ दिल्यामुळे पाणी काटकसरीने वापरून बचत करण्याचे नियोजन करावे.

राज्यासह जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असून ऊसतोड कामगारांच्या निवेदनाच्या अनुषंगाने सकारात्मक मार्ग काढून न्याय मिळवून देण्याच्या प्रयत्न करण्यात येईल. शासनाच्यावतीने शेतकऱ्यांसाठी १ रुपयांत पीक विमा, गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह विमा योजना, मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना, इथेनॉलच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. पवार यांनी केले.

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष ड. जगताप यांनी कारखान्याच्या कामकाजाबाबत माहिती दिली. कार्यकारी संचालक राजेंद्र यादव यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमापूर्वी उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते मोळी पुजन करून मोळी गव्हाणामध्ये सोडून गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव, बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार, बारामती तालुका सहकारी दूध संघाचे अध्यक्ष पोपटराव गावडे, नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शरद जगताप, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वास देवकाते आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची पहिली उचल प्रति में.टन. २५५०




पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी सह साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामात शुभारंभ दिनांक २४ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता विजयादशमीच्या मुहूर्तावर मनोरमा सह सहा बँकेचे चेअरमन श्री श्रीकांत मोरे श्रीकांत व त्यांच्या सुविद् पत्नी सौ शोभाताई मोरे एम एस सी बँकेचे माजी सदस्य श्री अविनाश महागावकर जखरा शुगरचे चेअरमन शुगरचे चेअरमन श्री बिराप्पा जाधव व कारखाने ज्येष्ठ सभासद हरी पाटील व श्री खंडू सुरवसे श्री सुखदेव हाके श्री औदुंबर पोरे श्री वसंत वाघ श्री दगडू भोसले बाबुराव भोसले आद्य मान्यवरांच्या शुभ असते व श्री श्री संतोष नेहतराव श्री धनंजय नाना कोतळकर श्री प्रताप गंगेकर महादेव धोत्रे निलेश आंब्रे लखन चौगुले प्रथमेश पाटील चंद्रशेखर कोण बहिरी सुधीर धुमाळ नागेश गंगेकर अरुण कोळी बालाजी मलपे संतोष पवार शिवाजी मस्के ऋषिकेश भालेराव काका पवार आदित्य फत्तेपूरकर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील व सर्व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला

यावेळी कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील म्हणाले की म्हणाले की गेल्या वर्षी सभासदांनी शेतकऱ्यांचे आशीर्वाद दिल्याने परिवर्तन घडून आले आणि आम्ही दुसऱ्या गळीत हंगाम यशस्वीपणे चालू करीत आहोत आपला कारखाना चालू झाल्यामुळे जिल्ह्यात ऊस दराचे स्पर्धा निर्माण झाली त्यामुळे जिल्ह्यातील सर्व साखर कारखाने कारखान्यांना जास्तीत जास्त दर देण्याचा भाग पडले यावर्षी आपल्या साखर कारखान्याकडे ३७००० एकर उसाचे एकर उसाचे नोंद झाली असून तोडणी वाहतूक यंत्रणा टायर बैलगाडी बैलगाडी डम्पिंग ट्रॅक्टर व मोठ्या व मोठ्या ट्रॅक्टरचे असे एकूण १००० वाहनांचे वाहनांचे करार झालेल्या असून करार झालेले असून मशनरीचे देखभाल व दुरुस्ती करून कारखाना गाळपसाठी सज्ज आहे तरी सर्व सभासदांनी आपला सर्व ऊस इतर कारखान्याला न देता आपल्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला दिल्यास मागील हंगाम पेक्षाही जास्त गाळप होईल व आपल्या कारखान्याच्या वजन काटा चोक असून जिल्ह्यातील इतर कोणत्याही साखर कारखान्याच्या काट्यावर बोलत नाही

याप्रसंगी याप्रसंगी गळीत हंगाम २०२३ - २४ मध्ये गणिताचे येणाऱ्या उसास प .मे.टन.२५५०/रुपयाची पहिली उचल उचल जाहीर केली आहे करण्यात आली सर्व भूस उत्पादक शेतकरी व सर्व सभासद जास्तीत जास्त ऊस गाळपस देऊन सहकार्य करतील असा विश्वास व्यक्त केला मागील हंगामात गणिताच आलेल्या उसाचे प.मे.टन.२४००/ रुपयाप्रमाणे रुपयाप्रमाणे आता केलेल्या असून केलेल्या असून दिवाळी सणासाठी उर्वरित शंभर रुपये शंभर रुपये अंतिम आप्ता अंतिम हप्ता या सवलतीच्या दरात सभासदांना साखर देण्यात येणार आहे तसेच कारखाना आर्थिक अडचणीत व त्यांची दिवाळी सण गोड होण्यासाठी पंधरा दिवसाचा पगार ११ दिवसाचा पगार बक्षीस म्हणून देण्यात येणार असल्याचे सांगितले

उजनी धरण साठ टक्के भरले आहे भरले असून त्यामध्ये ९५ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे उपलब्ध पाणी साठ्यातून चार पाया सोडण्याबाबत शासनाच्या निवेदन देण्यात आले आहे सदर निवेदनाची शासनाने दखल घेऊन दि २०ऑक्टोबर रोजीचा कालवा सल्लागार समितीच्या मीटिंगमध्ये दोन पाया सोडण्याची नियोजन करून एक नोव्हेंबर पासून पहिली पाळी सोडण्यात येणार आहे तसेच निरा व भाडगर कॅनल टून कॅनल मधून टेल टू हेड टेल टू हेड एक आहोत ना देण्याचे तिसंगी सोनके तलवारी सोडणार असल्याचे सांगितले व सध्याचे दुष्काळ परिस्थिती पाहता मागील त्याला शेततळे ही शासनाची योजना असून त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज भरून शेततळी पाडून घ्यावयाचे शेततळे भरून घेऊन सध्या परिस्थिती पाण्याचे व्यवस्थित नियोजन करावे व पाण्याची बचत करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीसाठी ठिबक सिंचन योजनेचा वापर करावा असे त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले कारखान्याची आर्थिक सहकार्य केल्याबद्दल एम एस सी बँक लोकमंगल बँक मनोरमा बँक व जकराई शुगर यांचे आभार व्यक्त केले. सदर प्रसंगी मनोरमा बँकेचे चेअरमन श्री श्रीकांत मोरे बोलताना म्हणाले या कारखान्याच्या इतिहास फार मोठा असून कारखाने चेअरमन श्री अभिजीत पाटील हे चार ते पाच साखर कारखाने चालवीत असल्यामुळे त्यांच्या अनुभवाच्या जोरावर या कारखान्यात गतवैभव प्राप्त करून देतील

सदर प्रसंगी प्रसंगी एमएससी बँकेचे माजी सदस्य श्री अविनाश महागावकर बोलताना म्हणाले की या कारखान्याच्या मोठ्या प्रमाणात कर्जाचा बोजा असताना हा कारखाना चालवण्याचे धाडस चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील यांनी केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले व पंढरपूरचे बाजारपेठ पुन्हा बोलतील अशी आशा व्यक्त करण्यात आली याप्रसंगी चक्राया शुगरचे चेअरमन श्री बिराप्पा जाधव म्हणाले की श्री अभिजीत पाटील हे माझ्या मित्राचे मुलगा असून शेतकरी कुटुंबातील व्यक्ती हा ज्या वेळेस उच्च पदावर जाऊन बसतो त्यावेळी शेतकऱ्यांच्या विकास होतो त्यामुळे हा कारखाना चेअरमन अभिताभ पाटील हे उत्तम प्रकारे चालवतील असे विचार त्यांनी व्यक्त केले

सदर प्रसंगी विकास आघाडीचे प्रमुख शिवसंग्राम पक्षाचे अध्यक्ष श्री सुधीर धुमाळ म्हणाले की श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रात नावाजलेला सहकारी साखर कारखाना आहे हा कारखाना चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील उत्तम प्रकारे चालवतील यापुढे भविष्यामध्ये तसेच त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून साथ देऊ असे असे ते म्हणाले यावेळी बोलताना श्री आदित्य फत्तेपूरकर म्हणाले की श्री विठ्ठल कारखाना आपल्या हक्काचा कारखाना असून शेतकऱ्यांना शेतकऱ्यांचा राजवाडा आहे सदर कारखाना टिकण्यासाठी चेअरमन श्री अभिताभ पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले सदर प्रसंगी सर्वश्री नागेश गंगेकर संतोष पवार संतोष नेत्रा बालाजी मलपे डी एस पाटील यांनी आपली मनोगत व्यक्त केली स्वागत व प्रास्ताविक कारखान्याचे संचालक संचालक श्री तुकाराम मस्के मस्के सर यांनी केले तर कारखान्याचे संचालक दिनकर चव्हाण यांनी उपस्थिताचे आभार मानले

यावेळी कार्यक्रमासाठी विहिरीचे संस्थापक सचिव श्री बीपी रोंगे सर रोंगे सर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रेमलाता रोंगे संचालक सर्वश्री संभाजी भोसले कालिदास पाटील दिनकर चव्हाण सुरेश भुसे बाळासाहेब हाके धनंजय काळे साहेबराव नागणे कालिदास साळुंखे दत्तात्रय नरसाळे जनक भोसले प्रवीण कोळेकर नवनाथ नाईक नवरे सिताराम गवळी अशोक जाधव सिद्धेश्वर बंडगर श्रीमती कलावती महादेव खटके सविता विठ्ठल रणदिवे तज्ञ संचालक सर्वश्रेष्ठ बागल अशोक तोंडले आनंद खेडगावकर अशोक घाडगे तानाजी बागल सचिन शिंदे पाटील समाधान गाजरे धनाजी खरात उमेश मोरे नागेश ननवरे कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री डी आर गायकवाड बँक प्रतिनिधी सीएसएम पाटील सदाशिव साखर कारखान्याचे एमडी अमर पाटील कारखान्याचे माजी संचालक पंढरपूर मंगळवेढा नगरपरिषदेचे आजी माजी नगरसेवक तसेच जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य सर्व अधिकारी कर्मचारी वर्ग कार्यकर्ते सभासद व्यापारी हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# गटशिक्षणाधिकारी पदी निवड झाल्याबद्दल प्रशांत आरबाळे यांचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट पंचायत समिती कार्यालयात येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळ कडून गटशिक्षणाधिकारी पदी प्रशांत आरबाळे यांचे निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आले.यावेळी बोलताना प्रशांत आरबाळे म्हणाले की अक्कलकोट तालुक्यातील प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांना शंभर टक्के शिक्षण मिळावं यासाठी व तालुक्यात शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे यासाठी गावातील लोकांचे व पालकांचे सहकार्य गरजेचे आहे, शाळे विषयी कुठलीही अडचण असल्यास मला संपर्क साधा आपल्या सेवेसाठी मी हजर राहीनयावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळ अक्कलकोट तालुका अध्यक्ष शिवशरणप्पा सुरवसे, शहर अध्यक्ष लक्ष्मण विभूते, प. महाराष्ट्र विभागीय उपाध्यक्ष सुदर्शन विभूते, समाज पंच भागवत विभुते, सोमनिग सुरवसे खजिनदार प्रवीण राऊत वागदरी ग्रामपंचायत सदस्य राजकुमार हुगे मेजर हणमंत जमादार मेजर भुरीकवठे येथील सामाजिक कार्यकर्ते शाबुद्दीन शेख परमेश्वर चौगले लक्ष्मीकांत घुंगरे परिचारक साहेब उपस्थित होते



# भारतीय बौद्ध महासभा करमाळा यांच्या वतीने ६७ वा धम्म चक्र प्रवर्तन दिन उत्सवात साजरा

करमाळा प्रतिनिधी :६७ व्या धम्म चक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे सामुदायिक बौद्ध वंदना घेऊन भारतीय बौद्ध महासभेचे वतीने करमाळा शहरातील प्रमुख मार्गावरून मोठ्या उत्साहाने मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीतील मुख्य आकर्षण सिध्दार्थ स्पोर्ट्स क्लब लेझीम संघाने आपल्या लेझीमच्या पथकाने व सनई वादांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते

या वेळी महिला वर्गाची मोठ्या संख्येने उपस्थित होते या वेळी सर्व आंबेडकरी चळवळीतील व विविध राजकीय सामाजिक चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

